# देशात करोना रुग्णसंख्येचा नवा कळस

## २४ तासांत ४ लाख १२ हजार जणांना लागण, ३९८० जणांचा मृत्यू

**पीटीआय, नवी दिल्ली**

**देशात एका** दिवसात करोनाची लागण होण्याच्या संख्येने आणि करोनामुळे मृत्यू होण्याच्या संख्येने यापूर्वीची विक्रमी नोंद मागे टाकत नवा विक्रमी टप्पा गाठला. गेल्या २४ तासांत चार लाख १२ हजार २६२ जणांना करोनाची लागण झाली असून ३९८० जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे बाधितांची एकूण संख्या दोन कोटी १० लाख ७७ हजार ४१० वर पोहोचली आहे तर मृतांची संख्या दोन लाख ३० हजार १६८ वर पोहोचली आहे, असे गुरुवारी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या वतीने सांगण्यात आले.

देशातील उपचाराधीन रुग्णांच्या संख्येतही सातत्याने वाढ होत असून ही संख्या ३५ लाख ६६ हजार ३९८ वर पोहोचली आहे, हे प्रमाण एकूण बाधितांच्या १६.९२ टक्के इतके आहे. करोनातून बरे होण्याचे प्रमाण ८१.९९ टक्क्यांवर आले आहे. आतापर्यंत करोनातून एक कोटी ७२ लाख ८० हजार ८४४ जण बरे झाले असून मृत्युदर १.०९ टक्क्यांवर आला आहे.

गेल्या २४ तासांत ३९८० जणांचा मृत्यू झाला त्यामध्ये महाराष्ट्रातील ९२० जणांचा समावेश आहे तर आतापर्यंत एकूण दोन लाख ३० हजार १६८ जणांचा मृत्यू झाला त्यापैकी ७२ हजार ६६२ जण महाराष्ट्रातील आहेत, असेही केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या वतीने सांगण्यात आले.

### करोना स्थितीबाबत मोदींकडून व्यापक आढावा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी देशातील करोनाच्या स्थितीचा व्यापक आढावा घेतला, आरोग्यविषयक पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी राज्यांना मदत आणि मार्गदर्शन केले पाहिजे, राज्यांनी लसीकरणाचा वेग कमी होऊ न देणे गरजेचे आहे, असे मोदी या वेळी म्हणाले.

देशातील ४५ वर्षांवरील जवळपास ३१ टक्के पात्र नागरिकांना लशीची किमान एक मात्रा देण्यात आली आहे. विविध राज्ये आणि जिल्ह्यांमधील करोनाची स्थिती, त्याचप्रमाणे सर्वाधिक रुग्ण असलेल्या १२ राज्यांमधील स्थिती त्याची माहिती या वेळी मोदी यांना देण्यात आली, असे पंतप्रधानांच्या कार्यालयातून जारी करण्यात आलेल्या एका निवेदनामध्ये म्हटले देण्यात आली.

# राज्यात करोनाचे ६२,१९४ रुग्ण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात गेले तीन दिवस ६० हजारांच्या आत रुग्णसंख्या नोंदविण्यात आली असताना गुरुवारी त्यात अंशतः वाढ झाली. दिवसभरात राज्यात ६२,१९४ नवे रुग्ण आढळले



असून, करोनामुळे ८५३ रुग्णांचा मृत्यू झाला. नाशिक जिल्ह्यात ६२३९ तर नाशिक शहरात २३१८ नवे रुग्ण आढळले. नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने आरोग्य यंत्रणा सावध झाली आहे. दिवसभरात पुणे शहर ३१६४, उर्वरित पुणे जिल्हा ४१५३, पिंपरी-चिंचवड २४१४, सोलापूर जिल्हा २४६०, सातारा २२६०, कोल्हापूर १४८७, रत्नागिरी ७५५, बीड १४३५, अमरावती जिल्हा ९३४, बुलढाणा २०५४, नागपूर शहर २७६८, उर्वरित नागपूर जिल्हा २०३२, चंद्रपूर जिल्हा १४०० नवे रुग्ण आढळले. राज्यातील आतापर्यंतच्या करोनाबाधित रुग्णांची संख्याही ४९ लाख ४२ हजार झाली. सध्या ६ लाख ३९ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत.

**मुंबईत आणखी ३,०५६ जणांना लागण**

मुंबईमधील ३,०५६ जणांना गुरुवारी करोनाची बाधा झाली असून ६९ रुग्णांचा मृत्यू झाला. मुंबईतील करोनावाढीचा दर ०.५१ टक्क्यांवर घसरला आहे. ठाणे जिल्ह्यात गुरुवारी २,३०१ नवे करोना रुग्ण आढळून आले, तर ५० जणांचा करोनामुळे मृत्यू झाला.

# नोंदणी झालेल्यांचेच आज लसीकरण

**मुंबई :** ‘को-विन’ अ‍ॅपमध्ये नोंदणी करून वेळ घेतलेल्यांचेच लसीकरण आजपासून लसीकरण केंद्रावर करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. त्यामुळे नोंदणी करून वेळ न घेतलेल्यांना आता केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

नोंदणी करून लसीकरणाचा दिवस, वेळ आणि लसीकरण केंद्राची निवड करावी. निवडलेल्या वेळेनुसार संबंधित केंद्रावर लसीकरणासाठी जावे, असे स्पष्ट निर्देश पालिकेने दिले आहेत.

**प्रमाणपत्र बंधनकारक**

४५ वर्षांवरील नागरिकांना दुसरी मात्रा घ्यावयाची असल्यास पहिली लस घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. याची पडताळणी केल्यानंतरच संबंधितांना लसीकरण केंद्रात प्रवेश दिला जाईल.

# ‘खासगी रुग्णालयांना प्राणवायू निर्मिती प्रकल्प सुरू करण्याचे आदेश द्या!’

**मुंबई :** करोनाच्या तिसऱ्या लाटेची आणि ती अधिक घातक असल्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यापार्श्वभूमीवर दिल्लीसारखी स्थिती उद्भवू नये यासाठी आतापासूनच खासगी रुग्णालयांना त्यांच्या पातळीवर प्राणवायू निर्मिती प्रकल्प सुरू करण्याचे आदेश द्या, अशी सूचना उच्च न्यायालयाने गुरुवारी राज्य सरकारला केली. याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट करावी. तसेच असा प्रकल्प सुरू करण्यासाठी रुग्णालयाला किती जागा लागेल, त्यासाठी किती खर्च येईल, काय साधनसामग्री लागेल याबाबतही माहिती देण्याचे आदेशही न्यायालयाने सरकारला दिले.

## मुंबई महापालिकेकडून शीघ्रकृती अभियान

**मुंबई :** मुंबई शहर आणि उपनगरातील करोना रुग्णसंख्या शून्यावर आणण्यासाठी महापालिकेने कंबर कसली असून शीघ्र कृती कार्यक्रम अभियान हाती घेतला आहे. याद्वारे शहराच्या विविध भागात जाऊन ५० फिरत्या दवाखान्यांमार्फत नागरिकांची प्राथमिक तपासणी करून करोना रुग्णांचा शोध घेतला जात आहे. अभियानाअंतर्गत ‘कंटेनमेंट झोन’ म्हणून घोषित केलेल्या परिसरात नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## ‘भारत म्हणजे नफेखोरीची बाजारपेठ नाही’

**मुंबई :** भारत काही परदेशी औषध उत्पादक कंपन्यांना नफा कमवून देणारी बाजारपेठ नाही. करोनाच्या संवेदनशील स्थितीचा जर परदेशी औषध उत्पादक कंपन्यांकडून नफा कमावण्यासाठी फायदा करून घेत असतील तर केंद्र आणि राज्य सरकारने त्याची दखल घेऊन अशा कंपन्यांवर कारवाई करावी, असे उच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. रेमडेसिविरला भारतात उत्पादन केलेली पर्यायी प्रभावी औषधे आहेत, असेही न्यायालयाने सांगितले.

**अत्त दिप भव**



**आयुष्यमान पांडूरंग नामदेवराव शिरसाट**
Retd. DGM Finance,
The shipping Corporation of India Ltd,
Retd. Member Dist. Consumer Forum,
Thane & Notary
शिक्षण: Mcom, LLB, FICS
वय: ७६ वर्षे (१/८/१९४५ ते २२/०४/२०२१)

अतिशय मेहनती, सखोल अभ्यासक, कार्य कुशल, कायदे तज्ञ, प्रामाणिक, सदाचारी आणि विपासना साधक. तुमचे भारदस्त व्यक्तिमत्व, सर्वांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती, कृतीशीलपणा, सर्व कुटूंबाला स्नेहाने एकत्र ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न आणि मन मिळाऊ स्वभाव, आप्त स्वकियांच्या आणि कुटूंबियांच्या सदैव स्मरणात राहील. तुमच्या आकस्मिक जाण्याने जी पोकळी निर्माण झाली ती तुम्ही शिकवलेल्या आदर्श विचारांना अनुसरुन भरुन काढण्याचा निश्चितच प्रयत्न करु.

**शोकाकूल परिवार:**
पत्नी मंदाकिनी, मुलगी व जावई राजकमल आणि युवराज, मुलगी आणि जावई निलकमल आणि संजय, मुलगा आणि सून पंकज आणि कविता, नातवंडे मुकूल, मुदिता, निपुण, यशदा, कनिष्का आणि प्रथम, पुतणे सुनिल आणि मिलिंद व समस्त शिरसाट, खंडारे, गवई, वानखेडे परिवार, ॲडव्होकेट परिवार आणि मित्रमंडळी.

**LARSEN & TOUBRO LIMITED**

Regd. Office: L&T House,
Ballard Estate, Mumbai 400 001.
CIN: L99999MH1946PLC004768
Tel No: 022-67525656
Fax No.: 022-67525893
Email: lgrc@Larsentoubro.com
website: www.Larsentoubro.com

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, NOTICE IS HEREBY GIVEN THAT a Meeting of the Board of Directors of the Company will be held on **Friday, 14th May 2021**, inter-alia, to consider and approve the audited consolidated and standalone financial results of the Company for the year ended **31st March 2021**, and to recommend dividend, if any.

This intimation is also available on the website of the Company at **www.larsentoubro.com** and on the website of the Stock Exchanges where the shares of the Company are listed at **www.bseindia.com** and **www.nseindia.com**

For **LARSEN & TOUBRO LIMITED**
**SIVARAM NAIR A**
**COMPANY SECRETARY**
**(FCS 3939)**

**Date: 6th May 2021**

**Reliance**
Industrial Infrastructure Limited

**नोंदणीकृत कार्यालय:** एन के एम इंटरनॅशनल हाऊस, ५वा मजला, १७८ बॅकबे रिक्लमेशन, एल् आई सी योगक्षेमा बिल्डिंगच्या मागे, बाबुभाई चिनाय मार्ग, मुंबई - ४०० ०२०
दूरध्वनी: ०२२-४४७७ ९०५३ • फॅक्स: ०२२-४४७७ ९०५२ • ईमेल: investor_relations@riil.in
CIN: L60300MH1988PLC049019

**सूचना**

**(कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)**

**विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरणात हस्तांतरण**

इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरण (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशाचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंड (''आयईपीएफ'') प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१२-१३ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक ६ मे, २०२१ च्या पत्राद्वारे व्यक्तिगतरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.

कंपनीने आपल्या वेबसाईटवर **www.riil.com** आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना **http://www.riil.in/transfer_suspense_accountiepf.html** ही वेब-लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारक दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी डिमटेरिअलाइजेशनसाठी आणि नियमांनुसार आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी कंपनी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.

**कंपनीला संबंधित भागधारकाकडून ८ ऑगस्ट, २०२१ रोजी किंवा तत्पुर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतींनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटेरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.**

भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यांनी श्री. एस्. पी. वेणुगोपाल, जनरल मॅनेजर, **केफिन टेक्नॉलॉजीस् प्रायव्हेट लिमिटेड**, कंपनीचे शेअर ट्रान्सफर एजंट्स यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, गचीबोवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद - ५०० ०३२, दूरध्वनी: + ९१-४०-६७१६ १७०८, फॅक्स: + ९१-४०-६७१६ १६८०, टोल फ्री क्र: १८००-४२५-८९९८ (सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००), ई-मेल: riilnkm@kfintech.com, वेबसाईट: www.kfintech.com येथे संपर्क साधावा.

**रिलायन्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** करिता
सही/-
**शैलेश ढोलकिया**
कंपनी सचिव आणि कंम्प्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ६ मे, २०२१

www.riil.in

**NEW INDIA ASSURANCE**
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd

**नोंदणी. व मुख्य कार्यालय :** ८७, एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
**सीआयएन क्र. : L66000MH1919GOI000526**
**आयआरडीएआय नोंदणीकृत क्र. : १९०**

एन्टरप्राइज रिस्क मॅनेजमेन्ट (ईआरएम) विविध ईआरएम, क्रियाकलाप अद्ययावत/ रिफ्रेश करण्यासाठी आणि सिस्टम/ टूलवर डॅशबोर्ड तयार करण्यासाठी ज्यामध्ये शीर्ष जोखीम समाविष्ट आहेत, व्यवसाय व मुख्य व्यवसाय विभाग आवश्यक ट्रिगरसह आमंत्रित केले जातात. ईओआय तपशील आमची वेबसाइट **www.newindia.co.in** वर उपलब्ध आहे. **प्रस्तुत करण्याची अंतिम तारीख : १७.०५.२०२१ च्या दुपारी ०२.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी आहे.**




**TATA STEEL LIMITED**

**Registered Offce:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

### ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०२० रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२० रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०२० रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | २१,२०२.५८ | १७,९६५.६६ | १४,२११.४३ | ६४,८६९.०० | ६०,४३५.९७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ७,५०६.८८ | ५,०७१.४७ | १,९१३.७८ | १५,०२२.०८ | ८,३१४.५६ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ८,४५६.१४ | ४,८४५.५३ | (९५.७०) | १७,७९५.१३ | ६,६१०.९८ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ६,५९३.५४ | ३,६१४.९४ | (४३६.८३) | १३,६०६.६२ | ६,७४३.८० |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ६,९५४.९८ | ३,६३१.७५ | (९२१.३९) | १४,०१५.३६ | ६,०९४.९३ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१९८.७८ | १,१४६.१३ | १,१४६.१३ | १,१९८.७८ | १,१४६.१३ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | ८९,२९३.३३ | ७३,४१६.९९ |
| नेट वर्थ | | | | ९१,२६७.११ | ७६,८३८.१२ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | | | | १३,५६७.६० | १३,०६६.९१ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | | | | ०.२४ | ०.४९ |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | ५७.०३ | ३१.११ | (४.२४) | ११७.०४ | ५७.११ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | ५६.६९ | ३१.१० | (४.२४) | ११७.०३ | ५७.११ |
| डिबेंचर विमोचन राखीव | | | | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | | | | ३.७३ | १.९३ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | | | | ६.९४ | ४.३७ |

### ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०२० रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२० रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०२० रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ४९,९७७.४० | ४१,९०२.३२ | ३६,००९.३७ | १५६,२९४.१८ | १४८,९७१.७१ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | १०,३४७.९९ | ५,७४६.७४ | १,९८३.०९ | १४,८८६.८५ | ३,५४९.१४ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ९,३५६.८६ | ५,५९३.१९ | (१,८७०.५५) | १३,८४३.६९ | (१,३८०.४४) |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ७,१६१.९१ | ४,०१०.९४ | (१,६१५.३५) | ८,१८९.७९ | १,१७२.४६ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ६,१३१.०३ | २,२०४.२० | ३,५६१.९९ | ९७८.७८ | ५,६५५.२९ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१९७.६१ | १,१४४.९५ | १,१४४.९५ | १,१९७.६१ | १,१४४.९५ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज | | | | ७५,५३५.८४ | ७२,७४२.९५ |
| प्रति समभाग प्राप्ती | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | ५७.५३ | ३१.८६ | (१३.३७) | ६३.७८ | ११.८६ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत अपवादात्मक बाबीनंतर) | ५७.१९ | ३१.८६ | (१३.३७) | ६३.७८ | ११.८६ |

**टीप :**

ए) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

बी) सेबी (लिस्टींग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ५२(४) च्या पोट-खंड (ए), (बी), (डी) व (ई) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींसाठी आवश्यक माहिती एनएसई आणि बीएसई ला (www.nseindia.com/www.bseindia.com) दिली आहे व युआरएल (www.tatasteel.com) वर पाहता येईल.

**टी. व्ही. नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई, ५ मे, २०२१

**TATA STEEL**

